10 MAR 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे काम

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे काम करीत आहे. शेजारील तीन-चार जिल्ह्यांशी त्यांचे आगळेवेगळे नाते आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री तथा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी रविवारी केले.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी कृती समितीतर्फे रविवारी राजमाता जिजाऊ सभागृहात दै.'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांना शिव-जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी आबिटकर बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाच्या जिजाऊ सभागृहात रविवारी भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल गायक कबीर नाईक नवरे आणि ६० कलाकारांनी या शिव महोत्सवात भारताचे आम्ही, भारताचे लोक हे संविधान गीत गायिले. (छाया : नसीर अत्तार)

यावेळी राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आ. राजेश क्षीरसागर, कुलगुरू डॉ. शिर्के यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. सरोज बिडकर यांनी प्रास्ताविक केले. सागर बगाडे यांनी आभार मानले. याप्रसंगी कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. धनराज नाकाडे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, शिवाजी विद्यापीठ आजी-माजी कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर, आदी उपस्थित होते.

## शिव महोत्सव रंगला...

शिव-महोत्सवात गायक राहुल सक्सेना, गायिका मधुरा कुंभार यांनी बहारदार मराठी, हिंदी गीते सादर केली. लोकशाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे आणि सँड आर्टिस्ट अमित माळकरी यांनी केलेले सादरीकरण लक्षवेधी ठरले. या समारंभात डॉ. सायरस पुनावाला इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांनी शिव सोहळा सादर केला. तसेच श्रीजा लोकसंस्कृती फाउंडेशन आणि रिव्हॉल्युशन डान्स ॲकॅडमी यांच्या कलाकारांनी नृत्याविष्कार सादर केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 MAR 2025 सकाळ

# विद्यापीठाने खुले केले उच्च शिक्षणाचे दरवाजे

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर : कलाविष्कारांनी रंगला शिवमहोत्सव



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे आयोजित रविवारी शिवमहोत्सवात विविध कलाविष्कारांनी रंगतदार झाला. ( छायाचित्र - सचिन कामत )

कोल्हापूर, ता. ९ : 'शिवाजी विद्यापीठाने पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले करताना त्यांचे भविष्य घडवले आहे', असे प्रतिपादन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे आयोजित शिवमहोत्सवात ते बोलत होते. दरम्यान, समूहगीत, शाहिरी ते सँड आर्टने शिवमहोत्सव रंगतदार झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजमाता जिजाऊ सभागृहात कार्यक्रम झाला.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'विद्यापीठात शिकलेल्या व शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकडून महोत्सव होत असल्याने त्याचा आनंद वेगळा आहे. विद्यापीठाने लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविले असून, आजही विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यापीठातील उच्च विद्याविभूषित प्राध्यापक वर्ग ज्ञानदानाचे कार्य करत आहे.' आमदार राजेश क्षीरसागर यांनी महोत्सवाच्या आयोजनाचे कौतुक केले.

यावेळी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांना 'शिवसंस्कार', तर डॉ. संजय कुबल यांना प्रशासकीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच आजी-माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रवणी कोडोलीकर यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार केला. शिक्षण, प्रशासन, सामाजिक क्षेत्रांतील अनेक मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. सरोज बिडकर यांनी प्रास्ताविक केले. गायक राहुल सक्सेना, गायिका मधुरा कुंभार, लोकशाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे आणि सँड आर्टिस्ट अमित माळकरी यांचे सादरीकरण प्रमुख आकर्षण ठरले. डॉ. सायरस पूनावाला इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांचा 'शिवसोहळा', श्रीजा लोकसंस्कृती फाउंडेशन (नृत्यदिग्दर्शक चंद्रकांत पाटील) आणि रिव्हॉल्युशन डान्स ॲकॅडमीने (नृत्य दिग्दर्शक रोहित पाटील) नृत्याविष्कार सादर केला. गायक कबीर नाईकनवरे यांच्या गायनाला तरुणाईने टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, ॲड. मंदार पाटील, डॉ. चांगदेव बंडगर, अभिजित राऊत, अजिंक्य शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
10 MAR 2025 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गाण्याच्या तालावर थिरकली तरुणाई

## सारेगमप फेम गायक राहुल सक्सेनाच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध



कोल्हापूर :संविधान गीताचे समूहगीत सादर करताना गायक कबीर नाईकनवरे व सहकलाकार.

प्रतिनिधी

कोल्हापूर

समूह गीताच्या बहारदार सादरीकरणांनी शिव–महोत्सवाला सुरुवात झाली. सारेगमप फेम गायक राहुल सक्सेना, गायिका मधुरा कुंभार, लोकशाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे आणि सँड आर्टिस्ट अमित माळकरी यांचे सादरीकरण प्रमुख आकर्षण ठरले. तर कलाकारांनी सादर केलेल्या गाण्यांच्या तालावर तरुणाई थिरकली.

महोत्सवांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या आजी–माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा, शिव पुरस्कार वितरण व भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाने साजरा झाला. शिवमहोत्सवात यंदाचा जीवनगौरव पुरस्कार दैनिक पुढारीचे मुख्य संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांना प्रदान करण्यात आला. तर विवेकानंद शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांना शिवसंस्कार पुरस्काराने गौरवण्यात आले. डॉ. संजय कुबल यांना प्रशासकीय पुरस्कार यांच्यासह शिक्षण, प्रशासन, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्रमुख पाहुणे पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने पश्चिम महाराष्ट्रातील चार जिल्ह्यातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवले आहे. त्यामुळे आजी–माजी विद्यार्थी आज या मातृसंस्थेत एकत्र येऊन स्नेहमेळावा साजरा करतात. आमदार राजेश क्षीरसागर यांनी शिव–महोत्सवाच्या आयोजनाचे कौतुक केले. तसेच तरुणाईला भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. सायरस पुनावाला इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांचा शिवसोहळा, श्रीजा



सारेगमप फेम गायक राहूल सक्सेना.

लोकसंस्कृती फाऊंडेशन (नृत्यदिग्दर्शक चंद्रकांत पाटील) आणि रिव्हॉल्युशन डान्स अ‍ॅकेडमी (नृत्यदिदर्शक रोहित पाटील) यांच्या नृत्याविष्काराने रसिकांची मने जिंकली. सांस्कृतिक कार्यक्रमाने विद्यापीठातील महोल संगीतमय झाला होता. गायक कबीर नाईकनवरे यांच्या गायनाला तरुणाईने टाळ्या–व शिट्ट्यांच्या आवाजात दाद दिली.

आजी–माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शिव–महोत्सवाचे प्रास्ताविक डॉ. सरोज बिडकर यांनी केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी संघटनेचे अ‍ॅड. मंदार पाटील, डॉ. चांगदेव बंडगर, अभिजीत राऊत, अजिंक्य शिंदे, अ‍ॅड. चंद्रकांत कुरणे, प्रवीण साळुंखे, ओंकार शेट्ये, महेश राठोड, पृथ्वीराज घोडके, अक्षय देसाई, सागर चव्हाण, नितीन पाटील, तुकाराम पाटील व कृती समिती सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2025
सकाळ



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# न्यू कॉलेजमध्ये कार्यशाळेला प्रतिसाद

कोल्हापूर, ता. ९ : न्यू कॉलेजमधील संख्याशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघ (सुस्ता) यांच्यातर्फे जिल्ह्यातील बी.एस्सी. भाग एकच्या (संख्याशास्त्र) विद्यार्थ्यांसाठी 'संख्याशास्त्राचे व्यावहारिक उपयोग एक्सप्लोर करणे' यावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित, तर प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य प्रा. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. 'सुस्ता'चे अध्यक्ष तथा शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. बी. महाडिक यांनी 'सुस्ता'बद्दल आणि कार्यशाळेच्या आयोजनाचा उद्देश सांगितला. डॉ.ए. ए. कलगोंडा यांनी परिचय करून दिला. समन्वयक डॉ. डी. जी. गोडसे यांनी आभार मानले. संस्थेचे उपाध्यक्ष डी. जी. किल्लेदार, संचालक वाय. एल. खाडे, प्राचार्य पी. के. पाटील, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य आर. डी. ढमकाले, प्रबंधक एम. वाय. कांबळे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी डॉ. पी. व्ही. सुखात्मे यांच्या कार्याचा उल्लेख केला. पहिल्या सत्रात प्रा. डॉ. एस. बी महाडिक, दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. एस. डी. पवार, तिसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठातील एम. एस्सी. भाग दोनच्या श्रुती पाटील आणि इतर विद्यार्थ्यांनी सर्वेक्षणाचे सादरीकरण केले. डॉ. अजिंक्य कोठावळे यांनी 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण' कशा पद्धतीने केले जाते, हे सांगितले. शेवटच्या सत्रामध्ये संख्याशास्त्रातील करिअरच्या संधींवर पॅनेल चर्चा झाली. डॉ. एन. एच. जाधव यांनी सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2025
तरुण भारत

# नाईट कॉलेजमध्ये बुधवारी राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि मराठी विभाग, नाईट कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने १२ व १३ मार्च रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. 'भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप' हा या चर्चासत्राचा विषय आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते १२ मार्च रोजी सकाळी १० वाजता उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम असतील. प्रमुख पाहुणे म्हणून कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, उपाध्यक्ष डॉ प्रसाद मगदूम, संचालक ॲड. वैभव पेडणेकर, ॲड. अमित बाडकर, अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. गोपाळ गावडे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, संघाचे अध्यक्ष डॉ. भरत जाधव, सचिव मांतेश हिरेमठ उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत राज्यभरातील मान्यवर उपस्थित राहणार असून नांदेड येथील डॉ. दिलीप चव्हाण यांचे बीजभाषण होणार आहे. प्राध्यापक, संशोधक विद्यार्थ्यांनी चर्चासत्रास उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. उत्तम पाटील, डॉ. अरुण शिंदे, डॉ. नंदकुमार कुंभार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR
लोकमत

# ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी शुल्क सवलत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने सुरु असलेल्या ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ अधिकार मंडळाने शुल्कामध्ये सवलत दिली.

याचा लाभ सरकारी संस्था, निमसरकारी व खासगी संस्था यामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचारी यांनी घ्यावा, असे आवाहन दूर शिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राचे प्र. संचालक डॉ. के.बी. पाटील यांनी केले. विद्यापीठातील आजी-माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य, शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर विद्यार्थी, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यापीठ व महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी व त्यांचे पाल्य यांना यातील एक किंवा एकापेक्षा अधिक गटात समावेश असणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षण शुल्कामध्ये एकत्रित १० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2025

सकाळ



कोडोली (ता. पन्हाळा) : येथील यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभप्रसंगी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जयंत पाटील, डॉ. पंकज विश्वकर्मा, विनीता पाटील, डॉ. मिलिंद गोडबोले, डॉ. लक्ष्मीकांत पाटील आदी.

# मानवी जीवन निरामय ठेवण्यासाठी आयुर्वेदाचा अवलंब हवा : डॉ. शिंदे

**कोडोली :** 'निसर्गातील सूक्ष्म बदलाने मानवी शरीर असंतुलित होत असते. ते संतुलित ठेवण्यासाठी आयुर्वेद शास्त्र प्रभावी ठरत असून मानवी जीवन निरामय ठेवण्यासाठी आयुर्वेद उपचार पद्धतीचा अवलंब केला पाहिजे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. येथील यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालयात आयोजित पदवीप्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सचिव डॉ. जयंत पाटील होते. यावेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेचे सदस्य डॉ. पंकज विश्वकर्मा म्हणाले, 'प्रत्येक रुग्णावर करण्यात आलेल्या औषधोपचाराची माहिती संकलित करून ठेवली पाहिजे.' यावेळी विश्वस्त विनीता पाटील, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत पाटील, डॉ. आद्रा थोरात, डॉ. राजश्री आवळे उपस्थित होते. प्राचार्य मिलिंद गोडबोले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मानसी बेलापुरे, सिद्धी बनकर, अनुषा खटावकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राजश्री महापुरे यांनी आभार मानले.

10 MAR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध उपक्रमांनी 'स्त्री शक्ती' चा जागर

## सामाजिक, शैक्षणिक संघटनांच्या वतीने आरोग्य शिबिरे, व्याख्यानांचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महिला दिनानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, राजकीय संस्था, संघटनांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यान, आरोग्य शिबिर, स्पर्धा, सत्कार आदी कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

**शहाजी कॉलेज**

महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील डॉ. प्रल्हाद माने यांनी संविधानाविषयी माहिती दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. स्वागत व प्रास्ताविक समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. एम. देसाई यांनी केले. डॉ. विशाल कुरणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. व्ही. चौरे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शहाजी कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. प्रल्हाद माने. सोबत डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. के. एम. देसाई, प्रा. एस. व्ही. चौरे आदी.**

यावेळी डॉ. मांडणीकर प्रबंधक रवि भोसले, अधीक्षक मनीष भोसले, डॉ. बलुगडे, डॉ सुरेश शिखरे, डॉ. दिपक वळवी आदी उपस्थित होते.

**अवनी**

अवनी आणि कस्तूरबा गांधी सेंद्रिय शेती प्रकल्प अंतर्गत महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी गावचे सरपंच जयसिंग शेळके, माया जोगाडे, केदार पाटील, आदी उपस्थित होते.

**मैत्री एचआयव्ही, एड्स संघटना**

महिला दिनानिमित्त कायद्यासंदर्भात महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. तृतीयपंथींनी आपल्या हक्कासाठी कायदे काय आहेत, यासंदर्भात माहिती दिली. यावेळी शौमिका महाडिक, कार्यकर्ते सचिन वायकुळे, मयूर सोळंकी, आरूष कुसळकर, चांद तंडवी, अमित तानवडे, आदींनी चर्चेत सहभाग नोंदवला.

**श्रमिक सेवा संस्था**

हॉकर्स जॉईंट ॲक्शन महिला कमिटीच्या वतीने निर्मला कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. शुभांगी पारजे, सिध्दी पाटील, पल्लवी जाधव, अन्वी घाडगे, आदींचा सन्मान करण्यात आला. डॉ. शुभांगी पारजे यांनी आरोग्याविषयी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2025
पुढारी

# कॉमर्स कॉलेजमध्ये आज कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावर राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये सोमवार (दि. १०) रोजी 'कृत्रिम बुद्धिमत्ता उच्च शिक्षणातील बदल आणि नवनिर्मिती - बहुविद्याशाखीय दृष्टिकोन' या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

परिसंवादाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. डॉ. होमी भाभा विद्यापीठ, मुंबईचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत बीजभाषण करणार आहेत. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम अध्यक्षस्थानी असतील.

यावेळी प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सदस्य अॅड. अमित बाडकर, अॅड वैभव पेडणेकर, उद्योजक आर्य देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. परिसंवादात डॉ. महेश शिंदे, डॉ. कबीर खराडे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. राष्ट्रीय परिसंवादात सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी केले आहे.

10 MAR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रिकेटमध्ये रसायनशास्त्र तर बास्केट बॉलमध्ये क्रीडा अधिविभाग विजयी







**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवातील ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारांचा पदक प्रदान सोहळ्याप्रसंगी वनस्पतीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आर. व्ही. गुरव तसेच विविध क्रीडा प्रकारात विजेत्या महिला ॲथलिअस. दुसऱ्या छायाचित्रात विविध क्रीडा प्रकारात विजेत्या पुरुष ॲथलिअस.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठमध्ये सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात आज चौथ्या दिवशी पुरूषांच्या क्रिकेटमध्ये अंतिम सामन्यात रसायनशास्त्र अधिविभागाने एम. बी.ए. विभागावर विजय मिळविला. बास्केटबॉल पुरुष स्पर्धेच्या अंतिम सामन्यात क्रीडा अधिविभागाने अर्थशास्त्र अधिविभागावर विजय मिळविला. आज सायंकाळी वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजाराम गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत ॲथलेटिक्समधील विविध प्रकारांतील विजेत्या क्रीडापटूंना पदक प्रदान करण्यात आले.

शिवस्पंदन स्पर्धेत आज चौथ्या दिवशी, पुरूषांच्या क्रिकेट स्पर्धेमध्ये यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटने तृतीय क्रमांक पटकावला. महिला क्रिकेट स्पर्धेमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग आणि गणित अधिविभाग यांच्यात अंतिम सामना उद्या रंगणार आहे. रस्सीखेच (महिला) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान विभाग, गणित विभाग, वाय. सी. एस. आर. डी., नॅनो सायन्स विभाग यांनी पुढील फेरीत प्रवेश केला. पुरुष स्पर्धेत एमबीए,

- **शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव**

वाय. सी. एस.आर.डी., क्रीडा अधिविभाग यांनी पुढील फेरीत प्रवेश केला. व्हॉलीबॉल (पुरुष) स्पर्धेत अनुक्रमे तंत्रज्ञान अधिविभाग, ग्रंथालय व माहितीशास्त्र आणि ए. जी. पी. एम. यांनी क्रमांक मिळविले. कब्बडी (पुरुष) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, वायसीएसआरडी, आणि एजीपीएम यांनी अनुक्रमे तीन क्रमांक मिळविले. कब्बडी (महिला) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग प्रथम, तंत्रज्ञान अधिविभाग व्दितील तर गणित अधिविभाग तृतीय क्रमांक पटकावला. बास्केटबॉल (पुरुष) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग प्रथम, अर्थशास्त्र अधिविभाग व्दितीर, तंत्रज्ञान अधिविभाग तृतीय क्रमांक मिळवला.

**ॲथलेटिक्स पुरुष व महिला स्पर्धेचा निकाल** : १०० मी. महिला– सानिया चौगुले (क्रीडा अधिविभाग) प्रथम, आदिती गुरव (भौतिकशास्त्र)व्दितीय, ऋचा पाटील (तंत्रज्ञान अधिविभाग) तृतीय. २०० मी. महिला– मनिषा पाटील (क्रीडा अधिविभाग) प्रथम, प्रेरणा गोडके (तंत्रज्ञान विभाग) व्दितीय, सानिया मोमीन (क्रीडा अधिविभाग) तृतीय. गोळा फेक (पुरुष)– जयवर्धन पाटील (क्रीडा अधिविभाग) प्रथम, ऋषिकेश पाटील (भूगोल) व्दितीय, योगेश देशमुख (एमबीए) तृतीय. लांब उडी (पुरुष)– आर्यन शेजाळ (क्रीडा अधिविभाग) प्रथम, साहिल शिकलगार (रसायनशास्त्र) व्दितीय, शुभम कांबळे (क्रीडा अधिविभाग) तृतीय. ४०० मी. (पुरुष)– प्रेम संकपाळ (तंत्रज्ञान) प्रथम, पार्थ कांबळे (क्रीडा) व्दितीय, रोहित बिराजदार (जैवतंत्रज्ञान) तृतीय.

10 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लाखो लेकींचे जीवन उजळणाऱ्या 'सावित्रीमाई'ची आठवण

**भारतात स्त्री शिक्षणाचा पाया घालणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचा आज स्मृतिदिन. बदलत्या भारतातही समकालीन राहिलेल्या या सत्यशोधक स्त्रीचे हे कृतज्ञ स्मरण!**



डॉ. रणधीर शिंदे
मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**आधुनिक** भारतातील आद्य स्त्री समाजसुधारक, पहिल्या शिक्षिका आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या आद्यप्रणेत्या म्हणून सावित्रीबाई फुले यांना आपण ओळखतो. महाराष्ट्राच्या समाजकार्य व स्त्री सुधारणा चळवळीत सावित्रीबाई फुले यांचे कार्य असाधारण ठरले. मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य मोलाचे होते. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाच्या पायाभरणी काळातील हा महत्त्वाचा आरंभटप्पा होता. त्यामुळे भारताच्या सामाजिक इतिहासात फुले दाम्पत्य व त्यांच्या कार्याला असाधारण महत्त्व आहे.

सावित्रीबाईंनी आयुष्यभर जोतिबा फुले यांच्या कार्यात मोलाची साथ दिली. स्त्री शिक्षणाबरोबर, अस्पृश्य सुधारणा व बालहत्या प्रतिबंधक गृहातील कार्य असो की दुष्काळ व प्लेगमधील कार्य आणि सत्यशोधक चळवळीतला सहभाग; या सर्व पातळ्यांवर सावित्रीबाईंनी केलेले कार्य महत्त्वाचे होते. सेवाभाव हा त्यांच्या कार्याचा विशेष होता. मानवसेवा हा त्यांच्या आयुष्यभरातील कार्याचा ध्यास होता.

धाडस, निर्भयता हे सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे विशेष होत. त्यावेळच्या परंपरावादी व्यवस्थेने त्यांच्या कामात असंख्य अडचणी आणल्या, त्याचा त्यांना त्रास झाला; परंतु त्या डगमगल्या नाहीत. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांना कोणत्याही प्रकारचा सामाजिक अवकाश उपलब्ध नव्हता, अशा प्रतिकूल काळात त्यांनी केलेले काम हे धाडसाचे आणि मौलिक होते. त्यामुळे भारताच्या सामाजिक इतिहासात त्यांच्या कार्याच्या फलश्रुतीस वेगळे असे महत्त्व आहे. तसेच बहुजन समाजात समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या स्त्रियांच्या त्या प्रेरणा ठरल्या. महात्मा फुले यांच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग व स्त्रियांच्या मुक्तिदायी समाजकारणास महत्त्वाचे स्थान होते. महात्मा फुले यांच्या 'कुळंबीण' कवितेत नरनारीतत्त्वाचा व समतेचा श्रेष्ठ असा आविष्कार आहे. स्त्री-पुरुषांतील या समतेचा आग्रह सावित्रीबाई फुले यांच्या कार्यदृष्टीत होता.

फातिमा शेख, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे या एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारणा करणाऱ्या स्त्रियांच्या कामात सावित्रीबाई फुले यांच्या कार्यदृष्टीचे अनुबंध आहेत. एका अर्थाने त्या बहुजन समाजातील स्त्री-जागरण पर्वाच्या आद्यसुधारक ठरतात.



सामाजिक विचार संवेदनांमुळे लेखिका म्हणून सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मय महत्त्वाचे ठरते, ते त्यातील प्रागतिक दृष्टीमुळे. त्यांच्या लेखनदृष्टीवर महात्मा फुले यांच्या विचारदृष्टीचा प्रभाव असणे स्वाभाविक आहे. सावित्रीबाई फुले यांची कविता ही मानवजीवन व सृष्टीविषयीच्या आत्मीय शैलीतील सरस अशी मनोगत कविता आहे. त्यांच्या वाङ्मयाचा स्वर हा प्रबोधनाचा आणि मानवतावादाचा आहे. 'शिक्षणाने येते मनुष्यत्व पशुत्व हटते' अशी त्यात दृष्टी आहे. त्यात नव्या युगाचे स्वागत आहे. 'वीरांची रणदेवाई ताराबाई, माझी मर्दिनी' असे वीरनायिकेचे इतिहास स्मरण आहे. शेती व निसर्गाची आनंदगाणी सावित्रीबाईंनी गायिली. त्यांच्या कवितेत ग्रामीण जीवनाची, शेतीशिवाराची व जन्मभूमीची लोभस अशी चित्रे आहेत. 'कितीक जातीजमाती, शिवारात या सुखे नांदती' हा भाव आहे. सावित्रीबाईंच्या कवितेस 'फुलांची कविता' म्हणूनही वेगळे महत्त्व आहे. जाई जुई-मोगरा, कण्हेरी, चाफा, गुलाब आणि हळदफुलांची बहरती उत्सवरूपे त्यांच्या कवितेत आहेत. या कवितेचे नाते मानवसृष्टी आणि भूमीप्रेमाशी घट्ट जोडलेले आहे.

सावित्रीबाई नव्या पिढीच्या आयकॉन ठरल्या. स्त्रियांच्या आत्मविश्वास पर्वाच्या त्या अग्रदूत ठरल्या. 'जोती-सावित्री' या शब्दांना महाराष्ट्राच्या इतिहासात वेगळे असे महत्त्व प्राप्त झाले. सावित्रीबाई फुले यांच्यावर विपुल कथा-कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. 'साऊ माझी माय' किंवा 'साऊ, पेटती मशाल' म्हणून त्या अनेकांच्या जीवनाच्या व लेखणीच्या प्रेरणासांगाती बनल्या. 'सावित्रीच्या आम्ही लेकी' असा सार्थ अभिमान बाळगणारी अभिमान परंपरा निर्माण झाली; परंतु आजही सावित्रीबाई फुले यांच्या स्वप्नसृष्टीतील वास्तव पूर्णत्वाला गेले असे म्हणता येत नाही. स्त्री-पुरुषसमतेचे चक्र अधुरेच आहे. स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना आजूबाजूस पाहायला, ऐकायला मिळतात. माध्यमांत केवळ परंपराशील स्त्री-प्रतिमेचेच गुणगान गायिले जाते. तर स्त्रियांना समानतेची वागणूक द्यायला समाज आजही खळखळ करतो. यासाठी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे प्रेरणास्मरण फार फार गरजेचे !

rss_marathi@unishivaji.ac.in